**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

- **सातव्या स्मृती दिनानिमित्त शाहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे सेना मेडल ( वीरता ) यांना मानवंदना**

गुरुवार दिनांक ७ ऑगस्ट २०२५ रोजी शहीद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे सेना मेडल (वीरता) यांनी देशासाठी केलेल्या सर्वोच्च बलिदानाच्या सातव्या स्मृती दिना निमित्ताने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने मानवंदना देण्याचा कार्यक्रम वीर स्मृती स्मारक शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे, मिरारोड (पूर्व) स्टेशनजवळ सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

शहीद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे यांच्या स्मृती स्मारकास पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. तसेच उपस्थित अधिकारी/कर्मचारी व नागरीकांनी तिरंगा प्रतिज्ञा घेतली.याप्रसंगी शहीद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे यांचे वीरपिता प्रकाशकुमार राणे आणि त्यांचे कुटुंबिय उपस्थित होते.

या कार्यक्रमास माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार घरत, अग्निशमन दल अधिकारी प्रकाश बोराडे, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, सहाय्यक आयुक्त जितेंद्र कांबळे, सहाय्यक आयुक्त सुनील यादव, उद्यान अधिक्षक नागेश वीरकर, माजी नगरसेवक, मिरा भाईंदर शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.